दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

## सीआरझेड बफर झोनमधील बांधकामांवर होणार कारवाई
## अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित
## उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महापालिका आयुक्तांची भुमिका

**ठाणे** (8) – ज्या ठिकाणी खारफुटीचे क्षेत्रफळ 1000 चौरस मीटरपेक्षा जास्त आहे त्या ठिकाणी 50 मीटर या ना बांधकाम क्षेत्रात उभ्या राहिलेल्या बांधकामावर कारवाई करण्यासंदर्भात उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी अतिरिक्त आयुक्त (1) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा महत्वाचा निर्णय आज घेतला.

मुंबई उच्च न्यायालयाने अलीकडेच ज्या ठिकाणी खारफुटीचे क्षेत्रफळ 1000 चौरस मीटरपेक्षा जास्त आहे त्या ठिकाणी 50 मीटरच्या ना बांधकाम क्षेत्रात जी बांधकामे उभी राहिली आहेत त्या बांधकामावर कारवाई करून ते क्षेत्र 2005 रोजीच्या स्थितीत आणण्याचे आदेश दिले होते. त्या पार्श्वभूमीवर आज महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी त्या संदर्भात अतिरिक्त आयुक्त (1) राजेंद्र अहिवर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्याचा निर्णय घेतला. या समितीमध्ये उपायुक्त(जनसंपर्क), उपायुक्त (अतिक्रमण), शहर व नियोजन अधिकारी प्रमोद निंबाळकर, प्रदूषण नियंत्रण अधिकारी, शहर विकास विभागाचे कार्यकारी अभियंता शैलेंद्र भेंडाळे आदींचा समावेश आहे. कोकण विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समिती ज्या पद्धतीने काम करते त्याच पद्धतीने ही समिती कामकाज करेल असे श्री. जयस्वाल यांनी स्पष्ट केले.

यावेळी श्री. जयस्वाल यांनी सद्यस्थितीत महापालिका हद्दीची सॅटेलाईट प्रतिमा तयार करून आजची परिस्थिती आणि 2005 रोजीची स्थिती यामध्ये असलेल्या तफावतीचा आढावा घेणे, खारफुटीच्या क्षेत्राचे ड्रोन कॅमेराद्वारे चित्रीकरण करणे, त्या ठिकाणी अतिक्रमणे होवून नयेत म्हणून त्या ठिकाणी संरक्षक भिंत बांधण्याबाबत संबंधित विभागास कळविणे, ज्या ठिकाणी खारफुटीची कत्तल झाली आहे त्या प्रकरणी अज्ञात लोकांविरूद्ध गुन्हा दाखल करणे, खारफुटीची कत्तल रोखण्यासाठी तक्रार निवारण प्रणाली तयार करणे याबाबत तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्याचप्रमाणे खारफुटी व्याप्त क्षेत्र वन विभागास हस्तांतरित करणेबाबतही श्री.जयस्वाल यांनी सुचित केले.

अतिरिक्त आयुक्त(1) यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीने सद्य स्थितीची पाहणी करून खारफुटी क्षेत्राचे नकाशे तयार करण्याची कार्यवाही करावी. सदर नकाशे प्राप्त झाल्यानंतर ते क्षेत्र 2005 सालच्या पूर्वस्थितीमध्ये आणण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी असेही यावेळी महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी स्पष्ट केले.